


गंगा जमुनामध्ये नासिर हुसेन, वैजयंतीमाला आणि दिलीपकुमार

चित्रपट गीतांमधे 'राम' किती?

पायोजी मैने राम रतन धन पायो...

२१ एप्रिल रोजी रामनवमी आहे. यानिमित्ताने हिंदी चित्रपटांत राम नामाचा महिमा सांगणारी किती गीतं बनली त्यावर एक दृष्टिक्षेप टाकण्याचा हा प्रयत्न...


◻ अजित पोपट

राम तेरा देश
वाह रे तेरा देश
जो यहां हो रहा ये
तमाशा है क्या तू भी देख...

गेल्या दीड महिन्यापासून गुजरातमध्ये राम जन्मभूमीच्या वादावरून जो तमाशा सुरू आहे तो पाहता आशा भोसलेंनी गायलेलं हे गीत किती अर्थपूर्ण आहे याची प्रचीती येते.

१९८६मध्ये अशोककुमार, विजयेंद्र घाटगे, हेमामालिनी, प्रेम चोप्रा वगैरे कलाकारांचा एक चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यातलं हे गाणं आहे. २१ एप्रिल रोजी रामनवमी आहे. त्यानिमित्ताने 'राम' नावाचा उल्लेख असणाऱ्या काही गीतांचा आपण विचार करणार आहोत. रामायणावर आधारित चित्रपट असेल तर त्यात एखाद-दुसरं रामगीत असणं स्वाभाविक आहे. पण सामाजिक किंवा राजकीय विषयावर बेतलेल्या चित्रपटातही राम दिसतो तेव्हा त्याचा संदर्भही वेगळा असतो.

गेल्या ५०-६० वर्षांत १००पेक्षा अधिक चित्रपटगीतांमधून राम नामाचा उल्लेख आढळतो. काही वेळा अरे बाप रे या अर्थानेही रामाचं नाव घेतलं जातं. तर काही ठिकाणी राम या शब्दाचा उपयोग उपहासात्मक आहे. पण फिल्मी गीतांचं रामनामाशिवाय चालत नव्हतं हेही खरं. सध्या रामाच्या नावावर जी जातीय दंगल होतेय त्यावेळी हा लेख लिहिताना मुद्दाम नमूद करावंसं वाटतंय की,



'वाह वाह रामजी...' सारखं हिट गीत असणाऱ्या *हम आपके है कौन* चित्रपटात माधुरी - रेणुका

राम आणि कृष्ण या दोघांवरील वरीच भजनं अशाप्रकारे मुस्लीम कलाकारांच्या वाट्याला आली आहेत. आणि आजचे राजकारणी आपल्या स्वार्थासाठी हिंदू-मुस्लिमांना धर्माच्या नावाने एकमेकांचे शत्रू करत आहेत. संगीताच्या जाणकारांसाठी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, सुख के सब साथी... हे गाणं राग दरबारीवर आधारित आहे.

ही झाली १९७० च्या दशकातली बाब. अगदी चित्रपटांच्या आरंभकाळापासून बोलायचं झालं तरी रामावर आधारित अनेक गीतं सापडतील. ज्यांनी उभ्या आयुष्यात दोनच चित्रपट पाहिले त्या महात्मा गांधींना विजय भटचा *रामराज्य* आवडला होता. त्याच विजय भटने नंतर १९५२ मध्ये *बैजू बावरा* बनवला होता. त्यात फक्त दीड-दोन मिनिटांची रामधून होती. तानसेनच्या महालाजवळून एक भजन मंडळ जात असतं. त्यात लहानगा बैजू आपल्या वडिलांबरोबर ही धून छेडतो...साचो तेरो नाम राम साचो तेरो नाम, झूठे जग के काम राम साचे तेरो नाम...

हे गीत गानसम्राज्ञी लता मंगेशकरांचे धाकटे बंधू हृदयनाथ यांनी बालवयात महंमद रफींबरोबर गायलं होतं. याचे गीतकार होते शकील बदायुनी तर संगीतकार नौशाद. दोघांनाही रामनामाचं काही वावडं नव्हतं. संगीतकार नौशाद तर रामाचं नाव घेताना सद्‌गदित होतात.

राम लखन चित्रपटातलं एक लोकप्रिय गाणं. यात एका आलिशान महालात एका बाजूला अमरिश पुरी आणि मंडळी आहेत तर दुसऱ्या बाजूला जॅकी श्रॉफ (राम) आणि डिम्पल कापडीया. नववधूच्या वेशात सजलेली माधुरी जॅकीला उद्देशून एक गीत म्हणते...'हो रामजी, तेरे लखन ने बडा दुःख दीना...'

यातल्या शब्दा-शब्दांत असलेली वेदना संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलालच्या संगीतातून परिणामकारकरीत्या व्यक्त झाली आहे.


राम नामाचा अतिशय वेगळा प्रयोग

चित्रपटगीतांतली बरीच रामगीतं मुस्लीम कलाकारांनी, संगीतकारांनी आपली प्रतिभा पणाला लावून लोकप्रिय केली. दिग्दर्शक ए. भीमसिंगच्या *गोपी* (१९७०) मध्ये दिलीपकुमार, सायराबानो, ओमप्रकाश, निरुपा रॉय, प्राण वगैरे कलाकार होते. कथानक अगदी साधं-सरळ होतं. दोन भावांमधल्या स्नेहाची, गैरसमजाची, दुराव्याची कथा आहे. यात रामाशी संबंधित दोन गीतं होती. एक होतं, 'रामचंद्र कह गये सीया से ऐसा कलजुग आयेगा...' तर दुसरं होतं 'सुख के सब साथी दुख में ना कोई...'

यातल्या पहिल्या गीताबद्दल बोलू या. 'रामचंद्र कह गये सीया से...'चे संगीतकार कल्याणजी (आनंदजी) एकदा 'जी'च्या प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले होते, 'आमचे दिलीपकुमारजींबरोबर जिव्हाळ्याचे संबंध होते, आजही आहेत. त्यांना संगीतातली चांगली जाण आहे. जेव्हा कुठे संगीताचा कार्यक्रम असतो, आम्ही त्यांना आवर्जून बोलावतो. एकदा आपल्या लोकसाहित्यावर कार्यक्रम होता. त्यात मंजिऱ्या वाजवणाऱ्या कलाकारांना पाहून ते खूप खूश झाले आणि म्हणाले, 'कधी संधी मिळाली तर मलाही त्या वाजवायला आवडेल.'

आणि आम्ही *गोपी*मध्ये त्यांना ती संधी दिली. कल्याणजीभाईंच्या म्युझिकरूममध्ये बसून युसूफभाईंनी दोन दिवस मंजिऱ्या वाजवण्याचा सराव केला होता. आणि त्यांच्या विनंतीवरूनच या गाण्यात जलद चालीत 'करीये न कुसंग संग बैठीये न जहां तहां कायर के संग शूर भागे ही भागे...' हा छंद जोडण्यात आला आणि ते गाणं दिलीपकुमारवर चित्रीत करण्यात आलं.

'सुख के सब साथी...' महंमद रफीने गायलेलं गीतही दिलीपकुमारवर चित्रीत करण्यात आलं होतं. योगायोग पहा, राधाकृष्णन्‌चं 'मधुबन में राधिका नाचे रे...' (चित्रपट *कोहिनूर*) हे गीतही दिलीपकुमारवर चित्रीत करण्यात आलं होतं.



*राम लखन*मध्ये 'ओ रामजी... तेरे लखनने बडा दुःख दीना...' गाणारी माधुरी

जागृती (१९५४) मध्ये केलाय. संगीतकार होते हेमंतकुमार आणि गाणं होतं, 'दे दी हमें आजादी, बिना खड्ग बिना ढाल, साबरमती के संत तुने कर दिया कमाल...' आणि यानंतर कोरसमध्ये 'रघुपती राघव राजाराम...' ही धून कानावर येते. याबद्दल बोलताना एकदा प्रदीपजी म्हणाले होते की, याच्या मुखड्याचं श्रेय नौशादला द्यायला हवं. नौशादने नूरजहाँच्या स्वरातल्या एका गीतावरून हा मुखडा बनवला होता. मूळ गीत *अनमोल घडी*मधलं होतं. त्याचे बोल होते, 'क्या मिल गया भगवान, मेरे दिल को दुखा के, अरमान की बस्ती में, मेरी आग लगा के...' हे गाणं गुणगुणल्यानंतर 'दे दी हमें आझादी...' म्हणा. हेमंतकुमारने बंदिशमध्ये 'रघुपति राघव राजाराम...' ऐवजी शहनाईचे सूर ठेवले होते. पण प्रदीपजींनी सुचवलं की गीत महात्मा गांधींवर आहे तेव्हा शहनाईऐवजी 'रघुपती राघव...' ही धून मुलांच्या आवाजात गाऊन घेऊया. अधिक परिणामकारक होईल आणि अशाप्रकारे या गाण्यात राम आले.

आपल्याकडे बोलण्याची एक पद्धत असते. देव करो आणि अमुक तमुक होवो. याचा सुंदर उपयोग *मिलन* (१९६७) मध्ये केला गेलाय. सुनील दत्त, नूतन, प्राण आणि शामा वगैरे कलाकारांच्या या चित्रपटातलं एक गाणं लक्ष्मीकांत-प्यारेलालनी मुकेशच्या आवाजात स्वरबद्ध केलं होतं. 'राम करे ऐसा हो जाये, मेरी निंदिया तोहे मिल जाये, मैं जागुं, तु सो जाये...' किती हळुवार कल्पना आहे ही.

याशिवाय अनेक रामभजनंही हिंदी चित्रपटांत आढळतात. उदाहरणार्थ आशाच्या आवाजातलं, 'रोम रोम में बसनेवाले राम, जगत के स्वामी, हे अंतर्यामी, मैं तुझ से क्या मांगु...' पुनर्जन्मावर आधारित *नीलकंमल* या चित्रपटात वहिदा रहमान नायिका आहे. हे गीतही मुस्लीम गीतकार साहील लुधियानवीचं आहे. रवीने संगीतबद्ध केलं आहे.

एक सुंदर पण नॉन फिल्मी राम भजन मुकेशने गायलंय. बोल आहेत, 'जिन के हृदय में श्री राम बसे उन और को नाम लियो न लियो...' एच.एम.व्ही.शी संबंधित संगीतकार मुरली मनोहर स्वरूप यांनी या गाण्याला संगीत दिलं होतं. मुकेशच्या आवाजातलं संपूर्ण तुलसीदास रचित रामायण एच.एम.व्ही.ने अल्बमच्या स्वरूपात संकलित केलं आहे.

याउलट काही चित्रपटगीतात राम नामाचा उपयोग चुकीच्या पद्धतीने केलेला दिसतो. राज कपूरच्या *संगम* चित्रपटात लता मंगेशकरांनी गायलेलं एक गीत आठवतं. त्याचे बोल होते, 'मैं का करू राम मुझे बुड्ढा मिल गया...' हे गीत गायला लताजी आधी तयार नव्हत्या. राम नामाचा असा दुरुपयोग त्यांना मान्य नव्हता. त्यांचा नकार ऐकल्यावर राज कपूरजी नाराज झाले. हा तिढा सोडवायचा कसा असा बाकीच्यांना प्रश्न पडला. नंतर राज कपूरजी, जयकिशन, वैजयंतीमाला यांनी त्यांना समजावलं आणि गाण्याचं रेकॉर्डिंग झालं. पुढे हे गाणं इतकं लोकप्रिय झालं की लताजींचा रागही निवळला असेल. *संगम* तर १९६४मध्ये आला. त्याआधीही राम नामाचा वेगळ्या अर्थाने उपयोग चित्रपटगीतात केला गेला होता. 'कुहू कुहू बोले कोयलीया...' या गाण्यामुळे शास्त्रीय संगीताच्या जाणकारांत लोकप्रिय झालेला *स्वर्ण सुंदरी* चित्रपट आठवतो. त्यात आगा, मुकरी आणि राधाकिशन यांच्यावर एक गीत चित्रित करण्यात आलं होतं. त्यावेळीही राधाकिशन थोडेसे नाराज झाले होते. कारण गाण्याचे बोल होते, 'रामनाम जपना पराया माल अपना...' अनेक दशकांपूर्वी गायलेल्या या गीतातील बोल आज खरे होताना दिसतात. असाच प्रयोग १९७४मध्ये प्रदर्शित झालेल्या *फिर कब मिलोगी*मध्ये आर.डी. बर्मनने लताच्या आवाजात गायलेल्या या गीतात केला होता, 'राम कसम, बुरा न मानुंगी, कोई पास आये युं ही मुझे छुके मुस्कुराये...' तर आणखी एक गीत *सास भी कभी बहू थी*चं आहे. योगायोगाने याचेही संगीतकार आर.डी. बर्मन होते. पण स्वर आशाचा होता. तिने गायलेलं गीत होतं, 'रामा काहे मैं इतनी जवान हो गई अच्छे अच्छों की नजर बदनाम हो गई...'

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे रामनामाशी संबंधित शेकडो गीतं हिंदी चित्रपटात आढळतील. पण धार्मिक चित्रपटातील रामगीतांचा यात समावेश केलेला नाही. रामनवमीच्या निमित्ताने हिंदी चित्रपटगीत रसिकांसाठी मुद्दाम वेगळी रामगीतं आपण विचारात घेतली आहेत. ●